मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज
महासागर

बर्डी पोलीस ठाण्यात सायबर सुरक्षा जनजागृती अभियान



■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. १० :

सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण आणि बदलत्या सायबर धोक्यांच्या पार्श्वभूमीवर Government Institute of Forensic Science, Nagpur आणि Quick Heal Foundation (QHF) यांच्या संयुक्त विद्यमाने बर्डी पोलीस ठाण्यात सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले.

या सत्रामध्ये हरीश गिरी आणि योगिता राठोड यांनी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधत सायबर गुन्ह्यांच्या विविध आधुनिक पद्धती, ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, बनावट लिंक, OTP व पासवर्ड सुरक्षा, सोशल मीडिया सुरक्षितता तसेच डिजिटल पुराव्यांचे महत्त्व याबाबत माहिती दिली.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे हे सत्र केवळ माहिती देण्यापुरते मर्यादित न राहता द्विमार्गी ज्ञानविनिमयाचे व्यासपीठ ठरले. सत्रादरम्यान पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या प्रत्यक्ष कामकाजातील अनुभव आणि सायबर गुन्ह्यांशी संबंधित माहिती शेअर केली. त्यामुळे विद्यार्थ्यांनाही सायबर गुन्ह्यांच्या प्रत्यक्ष स्वरूपाबाबत नवीन आणि महत्त्वपूर्ण माहिती मिळाली.

सायबर सुरक्षेच्या क्षेत्रात ज्ञानाची देवाणघेवाण जितकी वाढेल, तितका समाज अधिक सुरक्षित होईल, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या माध्यमातून Government Institute of Forensic Science, Nagpur आणि Quick Heal Foundation (QHF) यांनी सायबर सुरक्षिततेसाठी पोलीस यंत्रणा व समाज यांच्यातील जागरूकता अधिक मजबूत करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले.